# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**प्रेसनोट क्रमांक ३२९-२२** **दिनांक ०६/११/२०२२**

## ईलेक्ट्रिक बिल अपडेट करण्याच्या नावाने फसवणूक करण्यात आलेली २५,७३४/- रुपये रक्कम परत मिळविण्यास सायबर गुन्हे कक्षास यश.

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील तुळींज पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या श्रीमती प्रिया व विरार पोलीस ठाणे हद्दीत राहणारे श्री. वाडकर यांना त्यांचे मोबाईलवर अनोळखी व्यक्तीने फोन करुन तुमचे लाईट बिल भरलेले नाही, त्यामुळे तुमचे लाईट कनेक्शन बंद करणार असल्याचे सांगुन तक्रारदार यांच्या मोबाईल फोनवर आलेला ओटीपी प्राप्त करुन तक्रारदार यांचे बँक खात्यामधून पैसे गहाळ झाल्याबाबत तक्रारी अर्ज सायबर गुन्हे कक्ष येथे चौकशीकामी प्राप्त झाले होते.

सायबर गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार यांनी तक्रारदार यांचे बँक खात्यामधील झाले व्यवहाराची माहिती प्राप्त करुन मिळालेल्या माहितीच्या आधारे त्यांची फसवणूक रक्कम पेयु, पेटीएम, मोबिक्विक, फ्रिचार्ज या कंपनीचे पेमेंट वॉलेटवर गेल्याचे दिसून आल्याने संबधित कंपनीसोबत पत्रव्यवहार व पाठपुरावा करुन फसवणूक झालेली २५,७३४/- रुपये रक्कम तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आलेले आहे.

**घ्यावयाची काळजी :-**

- ईलेक्ट्रीसिटी कंपनी (अदानी/एमएसईबी/बेस्ट) ग्राहकांना कधीही फोन करुन बिल भरण्यास सांगत नाही.
- अशा प्रकारे फोन आल्यास खात्री झाल्याशिवाय कोणताही आर्थिक व्यवहार करु नये.
- आपल्या बँकेची गोपनीय माहिती कोणाकडेही उघड करु नये.
- आपला ओटीपी किंवा इतर कोणताही पिन क्रमांक देवू नये.

तरी सायबर गुन्हे कक्ष, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातर्फे नागरिकांना अशा प्रकारे होणाऱ्या फसवणूकीबाबत सतर्क राहणेबाबत जाहिर आवाहन करण्यात येत आहे. तसेच अशा प्रकारे कोणत्याही इसमाची फसवणूक झाल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा १९३० या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, पो.उप.निरी. प्रसाद शेनोळकर, म.पो.हवा.माधूरी धिंडे, पो.अं.प्रविण आव्हाड, म.सु.ब. आकाश बोरसे यांनी पार पाडली आहे.

**----0000----**